मुंबई शहर कबड्डी असोसिएशन

संलग्न : महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन
नोंदणी : मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम - १९५० क्रमांक एफ -४२७२

मारुती रामा जाधव
आजीव अध्यक्ष

भाई अर्जुनराव जगताप (आमदार)
अध्यक्ष

शिवकुमार उदय लाड
गो. वी. पारगांवकर
उपाध्यक्ष

मनोहर शावजी इंदुलकर
कार्याध्यक्ष

रामचंद्र मारुती जाधव
अनिल सदाशिव घाटे
कार्योपाध्यक्ष

विश्वास तुकाराम मोरे
प्रमुख कार्यवाह

भरत नबाजी मुळे
शरद कृष्णा कालंगण
संयुक्त कार्यवाह

शुभांगी दिनेश पाटील
खजिनदार

जावक क्रमांक : मु.श.क.अ./८५/२०२६-२७. दिनांक : १६/१०/२०२६.

प्रति,

मा. अध्यक्ष / कार्यवाह
संलग्न संस्था - मुंबई शहर कबड्डी असोसिएशन
मुंबई.
यांस

विषय :- किशोर - किशोरी गट मुंबई शहर जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा २०२६.

महोदय,

मुंबई शहर कबड्डी असोसिएशन आयोजित सन २०२६-२७ ची **"किशोर - किशोरी गट जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा"** दिनांक २७ ऑक्टोबर ते ०६ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे.

स्पर्धेबाबतची माहिती :-

१. स्पर्धा कालावधी :- २७ ऑक्टोबर ते ०६ नोव्हेंबर २०२६
२. स्पर्धेचे ठिकाण :- भारतीय क्रीडा मंदिर, वडाळा, मुंबई.
३. खेळाडूची वजन व वयोमर्यादा :
    अ) किशोर मुले :- वजन ६० किलो/वय १६ वर्षाखालील (०१.०१.२०११ व त्या नंतरची)
    ब) किशोरी मुली :- वजन ५५ किलो/वय १६ वर्षाखालील (०१.०१.२०११ व त्या नंतरची)
४. स्पर्धेत ऑनलाईन सहभाग घेण्याची अंतिम तारिख २४ ऑक्टोबर २०२६ रात्री १२.०० वाजेपर्यंत
५. फाईल जमा करणे व खेळाडूंची वजन २५ ऑक्टोबर २०२६ रात्री ८.०० वाजेपर्यंत

मुंबई शहर कबड्डी असोसिएशन वडाळा, मुंबई -३१ भारतीय क्रीडा मंदिर

आपला नम्र

श्री. विश्वास मोरे.
(प्रमुख कार्यवाह)

कार्यालय : भारतीय क्रीडा मंदिर, वडाळा, मुंबई - ४०० ०३१. फोन / फॅक्स : ०२२ २४१५ २९९९
ई-मेल : kabaddimumbai@yahoo.in, वेबसाईट : www.mumbaishaharkabaddi.com

मुंबई शहर कबड्डी असोसिएशन

संलग्न : महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन

नोंदणी : मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम - १९५० क्रमांक एफ -४२७२

मारुती रामा जाधव
आजीव अध्यक्ष

भाई अर्जुनराव जगताप (आमदार)
अध्यक्ष

शिवकुमार उदय लाड
गो. वी. पारगांवकर
उपाध्यक्ष

मनोहर शावजी इंदुलकर
कार्याध्यक्ष

रामचंद्र मारुती जाधव
अनिल सदाशिव घाटे
कार्योपाध्यक्ष

विश्वास तुकाराम मोरे
प्रमुख कार्यवाह

भरत नबाजी मुळे
शरद कृष्णा कालंगण
संयुक्त कार्यवाह

शुभांगी दिनेश पाटील
खजिनदार

जावक क्रमांक : मु.श.क.अ./

दिनांक : १६/१०/२०२६.

किशोर / किशोरी गट जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत सहभागी होणाऱ्या जिल्हानिहाय मुले / मुली खेळाडूंच्या वयाच्या दाखल्याबाबत महत्वाची सुचना

किशोर / किशोरी गट जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व संघातील खेळाडूच्या वयाच्या सबळ पुराव्यासाठी खालील दस्तऐवज देणे अनिवार्य आहे.

१. माध्यमिक शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थी खेळाडूंसाठी शाळेचा यु-डायस नंबर व स्टुडंट आय.डी. असलेल्या बोनाफाईड व निर्गम उताऱ्यावर खेळाडूच्या फोटोवर मुख्याध्यापकाने अर्ध साक्षांकीत केलेले असावे. शाळेच्या बोनाफाईड व निर्गम उताऱ्यावरील यु-डायस व स्टुडंट आय. डी. क्रमांकावरून संबंधीत दस्तऐवजाची सत्यता पडताळणी करण्यात येईल.

२. संबंधीत खेळाडूचे वय १ वर्षापर्यंत असताना संबंधीत शासकीय विभागाने वितरीत केलेला जन्मदाखला.

३. संबंधीत खेळाडूचे किमान ५ वर्षापर्यंत असताना संबंधीत शासकीय विभागाने वितरीत केलेला जन्मदाखला.

४. संबंधीत खेळाडूच्या वयाची ५ वर्ष पुर्ण झाल्यानंतर संबंधीत शासकीय विभागाचा जन्मदाखला असेल तर खेळाडूच्या पहिल्या इयत्तेतील प्रवेश घेतलेल्या जनरल रजिस्टरची सत्यप्रत अनिवार्य राहील.

५. आर.टी.ई. २००९ प्रमाणे प्रवेश घेतला असल्यास प्रथम प्रवेश घेतलेल्या शाळेचा यु.डायस व स्टुडंट आय.डी. असलेला निर्गम उतारा किंवा टि.सी. ची झेरॉक्स प्रत. वरील पैकी एका जन्मपुराव्या सोबत खालील एक कागदपत्रे असणे अनिवार्य आहे.

१. आधारकार्डची रंगीत छायांकीत प्रत व मुळप्रत (आधारकार्ड अद्यावत (Update) केलेले असावे, त्यामध्ये जन्मतारखेचा (तारीख / महिना /साल) स्पष्ट उल्लेख असावा).

२. पारपत्रची (Passport) रंगीत छायांकीत प्रत व मुळप्रत सोबत आणावी.

विषेश सुचना : सर्व खेळाडूंचे आधारकार्ड मोबाईलवर स्कॅन करण्यात येतील. छाननीच्या वेळी वरील पैकी पुरावा खोटा आढळल्यास त्या खेळाडूंवर व संघावर तीन वर्षाची बंदी घालण्यात येईल. उपरोक्त पुराव्याशिवाय इतर कुठलाही वयाचा पुरावा ग्राहय धरण्यात येणार नाही. सर्व बाबींची योग्य दखल घेवून आपआपले संघ स्पर्धेत सहभागी करावेत. कृपया सुचनांची गांभीर्याने नोंद घेवून काटेकोरपणे पालन करून सहकार्य करावे हि विनंती.

कार्यालय : भारतीय क्रीडा मंदिर, वडाळा, मुंबई - ४०० ०३१. फोन / फॅक्स : ०२२ २४१५ २९९९

ई-मेल : kabaddimumbai@yahoo.in, वेबसाईट : www.mumbaishaharkabaddi.com